# अध्ययन, निरध्ययन आणि पुनरध्ययन..
# अर्थात् Learning, unlearning and relearning

अध्ययन अर्थात शिकणे हा माणसाचा स्थायी भाव.. जन्माला आल्यापासून माणूस शिकत असतो.. अगदी बाल्यावस्थेपासून.. पहिले अध्ययन बाळाचे, अनुकरणातून होते. सभोवतालचे जग, जगातील माणसं आणि आप्त जन ह्यांच्या वागणुकीतून, ते बाळ निरीक्षण करत असते आणि त्या निरीक्षणातून शिकण्याच्या प्रक्रियेला सुरुवात होते. लहान मूल जणू मातीचा गोळाच समजतात. त्याला हवा तसा आकार देता येतो, त्याला हवे तसे घडवता येते कारण त्या वयात तर्कबुद्धी, चांगले वाईट ह्याची मीमांसा होत नसते, त्यामुळे त्या लहान बाळासमोर बोलताना आणि वागताना खूप काळजी घ्यावी लागते. एकदा शैक्षणिक प्रवासाला सुरुवात झाली की तर्कशुद्धता आणि चांगले वाईट ह्याची ओळख पटत जाते.

अध्ययन खरं तर चार प्रमुख पद्धतीने केले जाते.
१. बोलणे आणि ऐकणे
२. निरीक्षण
३. वाचन आणि लेखन
४. अनुकरण

साधारणतः बोलणे आणि ऐकणे ही सर्वसामान्य अध्ययन पद्धती अवलंबली जाते आणि त्याचसोबत वाचन आणि लेखन महत्वाचे ठरते. शालेय अभ्यासक्रमाचे ढोबळ रूप पाहता, ह्या चार पद्धतीने अध्ययन केले जाते.

त्याव्यतिरिक्त शिक्षकांचा बोलण्याचा सहभाग आणि विद्यार्थ्यांचा ऐकण्याचा सहभाग अध्ययनात महत्वाचा ठरतो. जुन्या काळी गुरुकुल पद्धत असायची - मुलांना एका ठराविक वयात आपल्या गुरूंकडे शिकावण्यासाठी पाठवले जात असे. तेथे विविध प्रकारचा विद्याभ्यास करतांना, विद्यार्थ्याला अनेक गोष्टींचे ज्ञान आत्मसात करता येत असे. त्यातील काही अध्ययन निरीक्षणातून तर काही अध्ययन अनुकरणातून होत असे.

अध्ययन ही सतत नवीन गोष्टी आत्मसात करण्याची प्रक्रिया आहे. अध्ययन म्हणजे नवीन ज्ञान आत्मसात करणे, उपलब्ध माहितीवर संस्करण करून त्याचे ज्ञानात रूपांतर करणे. नवीन गोष्टी आत्मसात करून आपल्या वागणुकीत बदल घडवून आणणे, नवीन कला आत्मसात करून ती कला

पुढे वृध्दिंगत करणे, तसेच उपलब्ध साधन सामुग्री आणि माहितीच्या आधारे नविन तंत्रज्ञान विकसित करून मानवी जीवन सुकर करणे इ. अध्ययनाचे प्राथमिक हेतू आहेत.

'निरध्ययन' अर्थात unlearning, हा अध्ययन मार्गातील महत्वाचा टप्पा मानायला हवा. Unlearning म्हणजे अध्ययनाच्या उलट म्हणायला हवे, किंबहुना जे काही शिकलो ते विसरण्याचा प्रयत्न करणे. काळाच्या ओघात आपण पूर्वी जी गोष्ट शिकलेली असते, ती बदलत्या काळात कार्यान्वित करणे अवघड असते. बदलत्या काळात आणि नवीन तंत्रयुगात, पहिल्या शिकलेल्या गोष्टी कालबाह्य ठरतात. अश्या वेळी जुन्या काळातील शिक्षण कालबाह्य ठरते. त्यामुळे त्यावेळी शिकलेल्या गोष्टी स्मृतीतून काढून टाकणे, क्रमप्राप्त ठरते. जसे संगणक क्षेत्रात रोज नवीन बदल घडत असतात, नवीन सॉफ्टवेअर्स विकसित होतात, त्यामुळे जुने सॉफ्टवेअर delete करणे आवश्यक असते. तसेच जुने तंत्रज्ञान, जुनी कालबाह्य माहिती जी कालानुरूप कालबाह्य ठरते असे ज्ञान विसरणे अथवा delete करणे आवश्यक ठरते. Unlearning अर्थात निरध्ययन केल्याने, जुन्या संकल्पना डोक्यातून निघून जातात आणि नवीन संकल्पना मनात आणि स्मृतीत रुजवायला मदत होते. जसे, जमिनीत उगवलेले तण, फोफावलेले अनावश्यक गवत काढल्याने जमिनीचा पोत सुधारतो आणि नवीन उत्तम बीज रोवण्यासाठी जमीन सुपीक बनते, तीच क्रिया म्हणजे निरध्ययन, म्हणजे unlearning होय. मनातील नकारात्मक विचारांचे तण दूर केल्याशिवाय आणि ते तण नष्ट केल्याशिवाय सकारात्मक विचारांचे बीज रोवले जात नाही तेच तत्व, unlearning प्रक्रियेत आहे. त्यामुळे कालानुरूप स्वतःला अद्ययावत आणि विकसित करायचे असेल तर निरध्ययन करून नवीन अध्ययनास तयार राहिले पाहिजे.

Relearning अथवा पुनरध्ययन.. काही वेळा अध्ययन करताना अनेक अडचणी उभ्या राहतात. कौटुंबिक जबाबदारी, सामाजिक बंधने अथवा इतर अडथळे यांच्यामुळे अध्ययनात खंड पडतो. शिक्षण अपूर्ण राहते, काही कालावधीसाठी अध्ययनात अवकाश घेणे क्रमप्राप्त ठरते, अश्या वेळी तो प्रतिकूल कालखंड ओसरल्यानंतर पुन्हा शिकण्याची अथवा अध्ययनाची, उर्मी स्वस्थ बसू देत नाही, त्यावेळी पुनरध्ययनाची प्रक्रिया सुरू होते. बरेच शिक्षक अध्यापनाचा मार्ग निवडतात आणि अध्यापन करत असताना 'अध्ययन 'सुरू करतात, तीच त्याच्या आयुष्यातील relearning ची सुरुवात असते. Relearning प्रक्रियेत साधारणतः दोन मुख्य परिस्थिती असतात, एक म्हणजे कालानुरूप खंडित झालेले शिक्षण पूर्ण करण्यासाठी अध्ययनास पुन्हा नव्याने सुरुवात करणे अथवा ह्यापूर्वी घेतलेले ज्ञान, तंत्रज्ञान पुन्हा नव्याने, नव्या युगात शिकण्यास प्रारंभ करणे. आपण वाहन चालवायला शिकतो, मात्र काही वेळा परिस्थितीनुसार त्यात खंड पडतो आणि सरावाअभावी वाहन चालवणे अवघड बनते, अश्या वेळी वाहन चालवण्यासाठी, पुन्हा शिकावे लागते, ह्यात प्रामुख्याने सराव महत्वाचा ठरतो. सरावामुळे त्या अध्ययनास नवीन सुरुवात होते, हेच पुनरध्ययन. Relearning वाटते तेवढे सोपे

नसते. त्यासाठी मनाचे सामर्थ्य आणि killer instinct महत्वाचे ठरतात. काही स्त्रिया लग्न करून संसारात रमतात, संसारात अनेक जबाबदाऱ्या पार पाडत असताना त्यांच्या शिक्षणात कधी खंड पडतो अथवा उच्च शिक्षण घेण्याची मनीषा अपुरी राहते. अश्या वेळी त्यांच्या सांसारिक जबाबदाऱ्या पूर्ण केल्यानंतर ठराविक कालखंडाने त्यांना पुन्हा स्वतःला गुंतवून घेणे महत्त्वाचे ठरते. अश्या वेळी पुनरध्ययन हा उत्तम पर्याय ठरतो. आजकाल distance learning चे अनेक पर्याय उपलब्ध असल्याने, नवीन तंत्रज्ञाची कास धरत relearning करणे सोपे झाले आहे, मात्र त्यासाठी आपल्या मनात शिकण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती हवी. आजकाल webinar, youtube आणि इतर अनेक दृक्श्राव्य माध्यमे उपलब्ध आहेत त्यांचा पुरेपूर वापर करत, अध्ययन सुरू ठेवता येते. पुनरध्ययनामुळे तुम्ही नवीन ज्ञान, तंत्रज्ञान आणि साधन सुविधेचा उत्तम वापर करत स्वतःला विकसित करू शकता.

माणसाला देवाने बुध्दी आणि विचार करण्याचे अलौकिक सामर्थ्य बहाल केले आहे. त्या मेंदूचा, बुध्दीचा उत्तम वापर करण्यासाठी अध्ययन महत्वाचे. माणसाने आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर सतत शिकत राहणे गरजेचे आहे, किंबहुना अध्ययन हे बुध्दीला उत्तम खाद्य आहे. त्यामुळे आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यात अध्ययन, निरध्ययन आणि पुनरध्ययन हे तीन टप्पे समोर येतात, त्या तीन टप्प्यात प्रवास करत सतत शिकण्याचा ध्यास मनात जागृत ठेवयाला हवा. प्रत्येक शिक्षित व्यक्तीने एखाद्या व्यक्तीला शिकवण्याचे ध्येय मनात रुजवायला हवे.
'Each one, teach one' ह्या तत्त्वाचा अवलंब करत समाज जागृत करायला हवा. आजकाल परिस्थिती खूप अनुकूल आहे, शिक्षणाचे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. समाजाची वैचारिक पातळी उंचावली आहे, आर्थिक पाठबळ उपलब्ध आहे. अश्या अनुकूल वातावरणात प्रत्येक व्यक्तीने अध्ययन आणि अध्यापनाचा ध्यास धरायला हवा, ज्यामुळे भरकटलेल्या नवीन पिढीला योग्य दिशा मिळेल.
'Learning is continuous process'
प्रत्येक व्यक्ती हा आजन्म विद्यार्थी असतो, त्यामुळे अध्ययन, निरध्ययन अणि पुनरध्ययन हे आयुष्यातील अविभाज्य घटक मानून त्यात सतत रममाण होणे गरजेचे आहे.

“There is no end to education. It is not that you read a book, pass an examination, and finish with education. The whole of life, from the moment you are born to the moment you die, is a process of learning.” – Jiddu Krishnamurti

“One hour per day of study in your chosen field is all it takes. One hour per day of study will put you at the top of your field within three years. Within five years you'll be a national authority. In seven years, you can be one of the best people

in the world at what you do.” – Earl Nightingale

"The illiterate of 21 st century isn't the one who can't read and write but the person who fails to continue the process of
'Learn, Unlearn and Relearn'."

**- मनोज मोहन कुरुंभटी**